## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की**

माझे नांव - सैय्यद नुर सैय्यद उस्मान
माझे वय - ४५ वर्षे,
व्यवसाय - ट्रक चालक
राहणार - गाझी प्लॉट अकोट ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.जे.डब्लयु गावंडे यांचे मार्फत.**

१ अकोट शहर पोलीस ठाण्यात मला पंचनाम्याकरीता बोलविण्यात आले होते. सदर पंचनामा बंदुक व गोळी पकडल्यासंबंधीचा होता. सदर वस्तु कबुतरी मैदान येथुन जप्त केल्या होत्या. त्या पाहिल्यास मी ओळखु शकणार नाही. सदर वस्तु नाथे नावाच्या इसमाकडन जप्त करण्यात आल्या होत्या. मी त्या इसमास ओळखु शकणार नाही. (सरकारी वकीलांनी साक्षदारास घटनास्थळ व जप्ती पंचनामे दाखविले.) आता मला दाखविलेल्या पंचनाम्यांवर अनुक्रमांक २ वर माझ्या एकुण दोन सह्या आहेत. सदर पंचनाम्यांमध्ये काय लिहलेले आहे ते मला माहिती नाही. (पंचनाम्यांवरील सह्यांना **निशाणी पी१ व पी२** देण्यात येते.)

**(साक्षीदार सत्य लपवित असल्याचे सांगून सहायक सरकारी वकील यांनी उलट तपासणी स्वरुपाचे प्रश्न विचारण्यासाठी परवानगी मागितली. पुरावा कायदा कलम १५४ परवानगी देण्यात येते)**

**२.** माझे शिक्षण इयत्ता ५ वी पर्यंत झालेले आहे. मला सहीचे महत्व कळते. मला खोटा मजकुर लिहलेल्या दस्तांवर सही करण्याची सवय नाही. घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर सही करण्यासाठी पोलीसांनी माझेवर दबाव आणला नव्हता.

**३.** हे म्हणणे खरे नाही की दि. २०.८.२०१८ रोजी सहायक पोलीस निरीक्षक डी.एन.फड यांनी मला माहिती दिली की कबुतरी मैदान येथे धन्नु सुरेटीया याचे पानपट्टीसमोर आरोपी हा देशी कट्टा व काडतुस घेवुन उभा आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यांनी मला सांगीतले की तेथे जावुन छापा टाकायचा आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यास मी माझी संमती दर्शविली व जागेवर गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की आम्ही तेथे गेल्यावर आरोपी जागेवर आढळुन आला. हे म्हणणे खरे नाही की तेथे कायदेशीर प्रक्रीया पार पाडुन त्याची अंग झडती घेतली असता आरोपीच्या जवळ एक गावठी बनावटीचा कट्टा, एक जिवंत काडतुस व सॅमसंग कंपनीचा मोबाईल मिळुन आले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर पोलीसांनी जागेवर माझे समक्ष दिसत्या परिस्थीतीचा पंचनामा तयार केला व त्यावर माझ्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर पोलीसांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन मिळुन आलेल्या वस्तुंचा स्वतंत्र जप्ती पंचनामा केला व त्यावर माझ्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी पंचनाम्यांवर आरोपीच्या देखील सह्या घेण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.डी.एम.कुटे यांचे मार्फत.</u>**

**४.** हे म्हणणे खरे आहे की मी जेवढया सह्या केल्या त्या सर्व एकाच वेळी केलेल्या आहेत. मी पोलीस ठाण्यात गेलो होतो कारण तेथे माझा परवाना जमा होता. कबुतरी मैदान येथुन नाथे नावाच्या इसमाकडुन वस्तु जप्त केल्याची बाब मला पोलीसांनी संगीतली होती.

उलटतपास संपुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

BHANUPRATAP B. CHOUHAN
Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2022.11.02 21:02:08 +0530

दि. २/११/२०२२.
अकोट

भानुप्रताप ब. चौहान
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोट